# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-२२४ दिनांक-१२/०६/२०२४

**गांजा हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगणाया आरोपीत यास अटक करुन त्यांच्याकडुन २३ किलो ७०० ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ ज्युपीटर मोटारसायकल, फोर्ड कार, मोबाईल फोन असा एकुण ७,६१,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन आरोपीत यास गजाआड करण्यात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.**

दिनांक ०८/०६/२०२४ रोजी १४.०० वा.च्या सुमारास रिलायबल, पेल्हार, नालासोपारा पुर्व येथे एक इसम गांजा हा अंमलीपदार्थ विक्रि करण्याकरीता येणार असल्याबाबत पेल्हार पोलीस ठाण्याचे पो.अं. १७०१५ अनिल यशवंत साबळे, यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशिर माहिती प्राप्त झाली होती. त्यांनी सदर माहिती मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांना दिली असता त्यांनी बातमीची सत्यता पडताळुन कायदेशिर कारवाई करणेबाबत पोलीस निरीक्षक श्री. शकिल शेख, व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/ तुकाराम भोपळे, व अंमलदार यांना आदेश दिले होते.

सदर आदेशान्वये पोलीस निरीक्षक शकिल शेख, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक/सोपान पाटील, पोलीस उप निरीक्षक तुकाराम भोपळे व पोलीस पथक यांनी जिओ पेट्रोल पंपाचे समोर, रिलायबल, पेल्हार, नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर येथे सापळा रचुन सदर ठिकाणी गांजा या अमंली पदार्थाची बेकायदेशिर रित्या विक्री करण्या करीता आलेला इसम - किशोर माणिक फुलेकर, वय ३२ वर्षे, नेरुळ पुर्व, पनवेल, ता.जि.रायगड, यांची व त्यांच्याकडे असलेल्या बॅगची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांच्या बॅगमध्ये २,६४,०००/- रुपये किंमतीचा १२ किलोग्रॅम वजनाचा कॅनाबीस या वनस्पतीची शेंडे म्हणजे गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला असुन नमुद आरोपीत यांचे विरुध्द दिनांक ०८/०६/२०२४ रोजी पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. ५२२/२०२४ गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम कलम ८(क), २०(ब)(ii), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करुन गुन्हयाचा गुन्हयाचा पुढील तपास सुरु केला. सदर गुन्हयाचे तपासात आरोपीत याने आणखी ११ किलो ७०० ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ भा.पु.का. कलम २७ प्रमाणे पंचनाम्याअंतर्गत तो व त्याचा साथिदार विक्री करण्याकरीता आलेल्या फोर्ड फियाट कार क्र. ए.पी ०९ सी एफ ३३६१ च्या डिक्कीमधुन काढुन दिलेला असुन आरोपीत यांच्याकडे अधिक तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त सो, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), शकील शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन),पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं.रवि वानखेडे, किरण आव्हाड, मिथुन मोहिते, दिलदार शेख, अभिजित नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड, निखील मंडलिक, सुजय पाटील, सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

